# १.२ )   +२ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम

१.२.१)  इ.११वी व इ.१२वी च्या स्तरावर सामान्य शिक्षणाला व्यवसाय शिक्षणाची जोड देवून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण द्यावे व रोजगार/स्वयंरोजगारास प्रवृत्त करावे. तसेच उच्च शिक्षणाकडे व महाविद्यालयांकडे जाणारा लोंढा थांबवावा हया उद्देशाने राज्यात सन १९७८-७९ पासून द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यांत आले. या योजने अंतर्गत व्यवसाय अभ्यासक्रम घेऊन इ.१२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांने रोजगार/स्वयंरोजगार करावा किंवा उच्च शिक्षण घ्यावे अशा दुहेरी उद्देशाने हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आल्यामुळे त्यास द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम संबोधतात.

इ.११वी व १२वी मध्ये ६ विषयांपैकी एक भाषा (१०० गुण) व इतर ४ वैकल्पिक विषयांपैकी एक विषय (१०० गुण) अशा दोन विषयांना सुट देवून त्याऐवजी ३३% व्याप्ती असलेला २०० गुणांच्या एका व्यवसाय विषयाची निवड करता येते.

राज्यात द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम या योजने अंतर्गत तंत्र, वाणिज्य, कृषी व मत्स्य अशा चार गटांमधून एकूण १६ व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यांत येतात. सदर अभ्याक्रमाची यादी व प्रवेश क्षमता इत्यादी माहिती **परिशिष्ठ १** मध्ये देण्यांत आली आहे.

**१.२.२ प्रती विद्यार्थी शुल्काचा दर (शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थासाठी)**

| | इ.११वी | इ.१२वी |
|---|---|---|
| १) प्रवेश शुल्क.रु. | २०/- | २२/- |
| २) शिक्षण शुल्क दरमहा रु. | २०/- (द.म.) | २२/- (द.म.) |
| ३) टर्म फी रु. | २०/- | २२/- (द.म.) |
| ४) प्रयोगशाळा फी रु. | ७०/- | ७०/- |
| ५) संस्था विकास निधी दरमहा रु. | १००/- (द.म.) | १००/- (द.म.) |
| ६) तारण धन रु. | २५/- | |

### १.२.३ प्रवेश व परिक्षा :-

इ.१० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना द्विलक्षी अभ्यासक्रमात इ.११ वी मध्ये गुणानुक्रमे प्रवेश देण्यांत येतो. या अभासक्रमासाठी इ.१२वी ची अंतिम परिक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण परीक्षा मंडळातर्फे घेण्यांत येते व प्रमाणपत्र देण्यात येते.

### १.२.४ द्विलक्षी अभ्यासक्रमाचे फायदे :-

- उत्तीर्ण विद्यार्थ्यांना रोजगार/स्वयंरोजगार करता येतो.
- उत्तीर्ण विद्यार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य मिळण्यास प्राधान्य.
- इ.१२वी उत्तीर्ण झालेल्या इच्छुक विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रमास दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळू शकतो.
- इ.१२वी उत्तीर्ण झालेल्या इच्छुक विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या सामायीक प्रवेश परीक्षेस पात्र समजण्यात येते.